# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलोरोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. ई-मेल- msbnpe@gmail.com ,दुरध्वनी : ०२२.२२६२०३६०

MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'.MeloRoad,Fort, Mumbai-400 001E-mail- msbnpe@gmail.com, Telephone - 022-22620360 website: www.msbnpe.org

---

क्र.मराशुवपशिम/ परीक्षा/506 /२०२६ दिनांक:२१/०२/२०२६

परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संस्थाप्रमुख,
मंडळाशी संलग्नीत सर्व ए.एन.एम व जी.एन.एम व इतर संलग्नीत पदविका संस्था,
महाराष्ट्र राज्य-

विषय: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पूरवणी परीक्षेसंदर्भातील माहिती व अंतर्गत गुण (Internal Marks) नोंदणी व हॉल तिकीट बाबत.

संदर्भ:- मंडळाचे पत्र क्र. मराशुपशिम/परिक्षा/१७०/२०२६ दिं.१२/०१/२०२६.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पूरवणी परीक्षेसंदर्भातील सर्व माहिती, परिक्षा केंद्र व हॉल तिकीट संस्थेच्या अधिकृत A.Y. २०२५-२६ च्या लॉगिन मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. यासंदर्भात ई-मेलद्वारे देखील सर्व मंडळाशी संलग्नीत अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात आलेले आहे.

तथापि, काही संस्थांनी परिक्षा अर्ज सादर केले असून विद्यार्थ्यांचे Internal Marks अद्यापपर्यंत भरले नसल्याचे निदर्शनास येत आहे.

त्या अनुषंगाने सर्व संबंधित संस्थांनी खालील बाबींची तात्काळ पूर्तता करावी:

१. संस्थेच्या A.Y. २०२५-२६ लॉगिन मध्ये उपलब्ध माहिती तपासावी.
२. विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण (Internal Marks) विहित कालावधीमध्ये भरावे.
३. सर्व प्रक्रिया विहीत कालावधीत पूर्ण करण्यात यावी.

उपरोक्त बाबीबाबत कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण येत असल्यास, त्याबाबत सविस्तर माहिती techsupport@msbnpe.ac.in या ई-मेलवर मंडळास तात्काळ कळविण्यात यावे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता मंडळामार्फत २३ फेब्रुवारी, २०२६ ही Internal Marks भरण्याकरीता अंतिम मुदतवाढ असून विहीत मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ (Extension) दिली जाणार नाही.

विद्यार्थी परिक्षेस अपात्र ठरल्यास तसेच विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आर्थिक व शैक्षणिक नुकसानाकरीता व कायदेशीर बाबी उद्भवल्यास सर्वस्वी प्राचार्य / संस्थाप्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी.

प्रबंधक

महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ